**वाचले :**

१. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
२. साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
४. भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८.
५. सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.
६. या कार्यालयाचे मनाई आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/पर्यटक/एस.आर.क्र.४१/२० दि.१०/०८/२०२०.

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/पर्यटक/एस.आर.क्र.४४/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दि.१२/०८/२०२०

**सुधारीत आदेश :**

ज्याअर्थी, पालघर जिल्हयामध्ये मान्सून कालावधीत मोठया संख्येने पर्यटक धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी येत असतात व त्याठिकाणी जिवीतहानी होण्याच्या घटना घडत असतात. सद्यस्थितीमध्ये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, पावसाळयात पालघर जिल्हयामध्ये असलेले धबधबे, तलाव किंवा धरणे, समुद्र किनारे या ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक पर्यटनासाठी आल्याने त्या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होण्याची व शारिरीक अंतर राखले न गेल्यास तेथे कोविड-१९ चा प्रसार व प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी पर्यटकांची सुरक्षा अबाधित रहावी व कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे आवश्यक असल्याने उपोद्घतातील अ.क्र.६ अन्वये आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये पालघर जिल्हयातील असलेले सर्व धबधबे, सर्व तलाव, सर्व धरणे, सर्व समुद्र किनारे येथे येण्यास मनाई आदेश लागू केला आहे. त्यामध्ये पालघर जिल्हयातील **सर्व किल्ले** यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४(C) आणि महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोविड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन दि.११/०८/२०२० ते दि.०८/१०/२०२० या कालावधीमध्ये **पालघर जिल्हयातील असलेले सर्व धबधबे, सर्व तलाव, सर्व धरणे, सर्व किल्ले आणि सर्व समुद्र किनारे** येथे येण्यास मनाई आदेश लागू करीत आहे.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१ (b) नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.१२/०८/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा. शिंदे)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**पालघर**

D/Prasad२०२०/folder manai aadesh/Paryatan manae aadesh

**प्रत:-**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता अग्रेषित.
५) पोलीस अधीक्षक पालघर महामार्ग पोलीस ठाणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार / पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.
७) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) तहसीलदार वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९) उप परिवहन प्रादेशिक अधिकारी, वसई यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांना पुढील कार्यवाहीसाठी.
११) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती व प्रसिध्दीकरीता.
१२) नस्तीकरिता.

जिल्हा दंडाधिकारी पालघर
सत्यमेव जयते
जिल्हा पालघर

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**पालघर**